दैनिक नवशक्ती, दि. ७ ऑक्टोबर २०२६

**महावितरण**

यू४०१०९एमएच २००५एसजीसी१५३६४५

(महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत उपक्रम)

नोंदणीकृत कार्यालय : प्रकाशगड, प्लॉट क्र. जी–९, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र, भारत ४०००५१. दूरध्वनी क्रमांक: ०२२–२६४७४२११, एक्सटेंशन– २६०७

ईमेल: company_secretary@mahadiscom.in वेबसाइट: www.mahadiscom.in

**फॉर्म क्र. आरएससी–४**

**राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण,**

**मुंबई येथील खंडपीठ, मुंबई यांच्यासमोर**

**कंपनी याचिका क्र. सीपी २०२६ मधील २६९**

कंपनी कायदा, २०१३ च्या बाबतीत;

**आणि**

कंपनी कायदा, २०१३ चे कलम ६६ आणि त्याअंतर्गत बनवलेल्या नियमांतर्गत दाखल केलेल्या याचिकेच्या बाबतीत;

**आणि**

महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी डिस्ट्रीब्यूशन कंपनी लिमिटेडच्या (यू४०१०९एमएच २००५एसजीसी१५३६४५ ) भागभांडवल कपातीच्या बाबतीत.

महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी डिस्ट्रीब्युशन कंपनी लिमिटेड )
(एमएसईडीसीएल), )
यू४०१०९एमएच २००५एसजीसी१५३६४५, कंपनी कायदा, )
१९५६ अंतर्गत नोंदणीकृत कंपनी, नोंदणीकृत कार्यालयः )
प्रकाशगड, प्लॉट क्र. जी–९, अनंत काणेकर मार्ग, )
वांद्रे (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र, भारत, ४०००५१. )

..... याचिकाकर्ती कंपनी

## जाहीर सूचना

यान्द्वारे कळविण्यात येते की, याचिकाकर्त्या कंपनीच्या वाटप केलेल्या स्वाक्षरित आणि भरणा झालेल्या समभाग भांडवलाची कपात निश्चित करण्यासाठी राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण, मुंबई (एनसीएलटी) कडे दि. १२ सप्टेंबर २०२६ रोजी कंपनी याचिका दाखल करण्यात आली आहे. याद्वारे कंपनीचे सध्याचे भरणा झालेले समभाग भांडवल भारतीय रुपये ४९,७२१,६५,४९,०४० (एकोणपन्नास हजार सातशे एकवीस कोटी पासष्ट लाख एकोणपन्नास हजार चाळीस रुपये फक्त), जे प्रत्येकी रुपये १० (दहा रुपये फक्त) मुल्याच्या ४९,७२,१६,५४,९०४ (चार हजार नऊशे बहात्तर कोटी सोळा लाख चौपन्न हजार नऊशे चार रुपये फक्त ) समभागांमध्ये विभागलेले आहे; ते कमी करुन रुपये १२,७२१,६५,४९,०४० (बारा हजार सातशे एकवीस कोटी पासष्ट लाख एकोणपन्नास हजार चाळीस रुपये फक्त), जे प्रत्येकी रुपये १० (दहा रुपये फक्त) मूल्याच्या १२,७२,१६,५४,९०४ (एक हजार दोनशे बहात्तर कोटी सोळा लाख चौपन्न हजार नऊशे चार रुपये फक्त) समभागामध्ये विभागलेले आहे, असे करण्यात येतील. यासाठी प्रत्येकी रुपये १० (दहा रुपये फक्त) चे ३७,००,००,००,००० (तीन हजार सातशे कोटी) समभाग रद्द करण्यात येतील.

दि. १ एप्रिल २०२६ पासून, कृषी व्यवसाय उपक्रमाच्या हस्तांतरणाशी संबंधित आवश्यक समायोजने आणि दि. १ एप्रिल २०२६ पूर्वीच्या कालावधीशी संबंधित काही लेखापरीक्षण हरकतींच्या निवारणातून निर्माण होणारा परिणाम विचारात घेतल्यानंतर, दि. १ एप्रिल २०२६ रोजीच्या हिशोब पुस्तकांनुसार 'इतर इक्विटी – संचित नफा' अंतर्गत दिसणारी एकत्रित एकूण रुपये ३,७०,००,००,००,००० (सदतीस हजार कोटी रुपये फक्त) पेक्षा जास्त नसलेली संचित हानी समायोजित करण्यासाठी कॅपिटल रिडक्शन अकाउंटचा वापर केला जाईल. अशा समायोजनानंतर शिल्लक राहिलेली कोणतीही रक्कम 'भांडवली राखीव निधी' म्हणून मानली जाईल.

राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण, मुंबई यांच्या आदेशानुसार वैयक्तिक धनकोंना सूचना पाठविण्यात आल्या आहेत. याचिकाकर्त्या कंपनीने दि. ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत तयार केलेली धनकोंची यादी याचिकाकर्त्या कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात, प्रकाशगड, प्लॉट क्र. जी–९, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र, भारत, ४०००५१ येथे दि. १२ ऑक्टोबर २०२६ ते दि. २९ जानेवारी २०२७ दरम्यान सर्व कामकाजाच्या दिवशी सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० या वेळेत तपासणीसाठी उपलब्ध आहे. ज्या धनकोंच्या ई–मेल आणि टपाल पत्त्यांची याचिकाकर्त्या कंपनीकडे नोंदणी झालेली नाही, ते सदर सूचना प्राप्त करण्यासाठी त्यांचा ई– मेल आयडी कंपनीच्या company_secretary@mahadiscom.in या ई–मेलवर पाठवून नोंदणी करु शकतात.

याचिकाकर्त्या कंपनीच्या कोणत्याही धनकोला या याचिकेबद्दल किंवा धनकोंच्या यादीतील तपशीलांवर काही हरकत असल्यास, ती हरकत (पुराव्याच्या कागदपत्रांसह) आणि त्यांचे नाव व पत्ता तसेच (असल्यास) अधिकृत प्रतिनिधीचे नाव व पत्ता या सूचनेच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत खालील स्वाक्षरीकर्त्यास कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात पाठवावी.

वर नमूद केलेल्या वेळेत कोणतीही हरकत न मिळाल्यास, याचिकाकर्त्या कंपनीचे भाग भांडवल कमी करण्याच्या वरील याचिकेच्या सर्व कामकाजात धनकोंच्या यादीतील नोंदी बरोबर असल्याचे मानले जाईल.

याचिकेची नोंद घेता, सदर याचिका राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण, मुंबई (एनसीएलटी) द्वारे दि. २३ सप्टेंबर २०२६ रोजीच्या आदेशान्वये मंजूर करण्यात आली असून, त्यावर बुधवार, दि. ३ फेब्रुवारी २०२७ रोजी एनसीएलटी या याचिकेवर सुनावणी करेल असे निश्चित करण्यात आले आहे. कोणत्याही धनकोला सुनावणीस उपस्थित राहायचे असल्यास त्यांनी त्यांच्या हरकतीसह (असल्यास) विनंती अर्ज करावा.

**महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी डिस्ट्रिब्युशन कंपनी लिमिटेड करिता,**

**स्वाक्षरी/–**

**अंजली गुडेकर**

**कंपनी सचिव**

**(एसीएस : १९९३७)**

**दि.**:– ०७ ऑक्टोबर २०२६

**ठिकाण:**– मुंबई

**HO PR 240/26**